“... आणि यापैकी सर्वाधिक सुंदर ठिकाण म्हणजे समुद्राच्या लाटांमध्ये उठून दिसणारे ‘मलबार पॉइंट’ या नावाने ओळखले जाणारे भूशिर आणि त्यावर एखाद्या सुंदर मुकुटाप्रमाणे शोभणारी, सुरुवातीला सर जॉन माल्कम् यांचे निवासस्थान असलेली आणि आता राज्यपालांचे निवासस्थान म्हणून संरक्षित करण्यात आलेली, परळ येथे उष्ण हवेची धग जाणवू लागल्यावर सुखद गारवा देणारी राज भवनाची देखणी वास्तू.

अवखळ लाटांनी वेढलेल्या खडकाळ डोंगरमाथ्यावर वसलेले गरुडाच्या घरट्यासारखे हे सुंदर ठिकाण केव्हाही पाहिले तरी नेत्रदीपकच आहे. परंतु विशेषतः, सूर्य अस्ताला जाताना, समुद्राच्या निळ्या–हिरव्या पाण्यात अर्धवट बुडालेल्या सूर्याच्या सुवर्णबिंबाची सोनेरी किरणे माडांच्या झावळ्यांच्या किनारींवरून परावर्तित होतात आणि आसमंत भरुन टाकतात, त्यावेळी तर त्याचे सौंदर्य शब्दातीत असते.”

*– १९ व्या शतकातील एक प्रवासिनी मिसेस पोस्टान्स ह्यांनी केलेलं मुंबई राज भवनाचे वर्णन.*

“महाराष्ट्रातील राज भवन हे भारतातील सर्वांत सुंदर राज भवनांपैकी एक आहे. येथून सूर्योदयही दिसतो अन् सूर्यास्तही. समुद्राने तिन्ही बाजूंनी वेढलेले हे ठिकाण केवळ नेत्रदीपक आहे.”


*– एस्. एम्. कृष्णा,*
*महाराष्ट्राचे राज्यपाल (२००४ ते २००८)*

सत्यमेव जयते

महाराष्ट्रातील राजभवने

**वैभवशाली इतिहासाची साक्षीदार**






सत्यमेव जयते

महाराष्ट्रातील राजभवने **वैभवशाली इतिहासाची साक्षीदार**



## महाराष्ट्रातील राजभवने

# वैभवशाली इतिहासाची साक्षीदार

कालरुपी वाळूत पदचिन्हे उमटवीत, साध्या पण मनमोहक शांत परिसरात परिपूर्णतेने वसलेले भव्य आणि वैभवशाली मुंबई राज भवन एका बाजूला निसर्गाच्या बदलत्या ऋतुरंगांचे चिंतन करते तर दुसऱ्या बाजूला सदैव जागत्या मुंबई महानगरीच्या विविधरंगी स्वरुपाचे निरीक्षण करीत असते.

मलबार हिल या मुंबईतील उच्चभ्रू वसाहतीमध्ये असलेल्या राज भवनाच्या परिसराची गणना देशातील सर्वाधिक आकर्षक परिसरांत होईल, यात शंका नाही. सन १८८५ पासून ब्रिटिश गव्हर्नरांचे व सध्या महाराष्ट्राच्या राज्यपालांचे निवासस्थान असलेले राज भवन राजकीय सत्तेचे केंद्र राहिल्यामुळे पाहणाऱ्यांच्या मनात तत्काळ आदरयुक्त विस्मय जागृत करते.

स्वातंत्र्यपूर्व काळात ‘गव्हर्नमेंट हाऊस’ या नावाने परिचित असणारे राज भवन मलबार हिल येथील ४७–एकर परिसरामध्ये स्थिरावण्यापूर्वी ‘मनोर हाऊस’, ‘फोर्ट हाऊस’ व ‘परेल हाऊस’ या ठिकाणी होते.

महाराष्ट्रात मुंबई येथील राज भवनाव्यतिरिक्त पुणे व नागपूर येथे आणखी दोन राज भवने आहेत. याशिवाय महाबळेश्वर येथेदेखील राज्यपालांकरिता एक छोटेखानी उन्हाळी निवासस्थान आहे.

या सर्व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वास्तूंचे तसेच त्यांच्या सभोवतालच्या निसर्गरम्य परिसराचे छायाचित्रण करुन पुस्तकरुपाने लोकांपुढे आणण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

सत्यमेव जयते

महाराष्ट्रातील राजभवने

# वैभवशाली इतिहासाची साक्षीदार

© राज भवन, मुंबई
जून २०१३

सजावट प्रकाशक व मुद्रक :–
spenta multimedia
IDEATE | CREATE | PUBLISH

कार्यकारी प्रकाशक । माणेक ई. दावर
संपादन । ऐशिक बरुआ, समिरा मेजर
छायाचित्रकार । सुधारक ओलवे
कला संचालक । परवेझ शेख
सहा. कला संचालक । योगिता अय्यर
डिजिटल इमेजिंग । निनाद जाधव, रोहित नायक
समन्वय । मिंजल कडाकिया
मराठी भाषान्तर । उमेश काशीकर
मुद्रित शोधन । अरुणा श्रीपाद दुभाषी, गौरी केळकर

संशोधन संदर्भ:
। राजभवन्स इन महाराष्ट्र – श्री सदाशिव गोरक्षकर
। www.rajbhavan.maharashtra.gov.in

मुद्रक व प्रकाशक
स्पेंटा मल्टिमीडिया, पेनिन्शुला स्पेंटा
मथुरादास मिल कंपाउन्ड, एन्. एम्. जोशी मार्ग
लोअर परेल, मुंबई – ४०० ०१३.
फोन न. २४८१ १०१० फॅक्स : २४८१ १०२१
www.spentamultimedia.com

ह्या पुस्तकाचा कुठलाही भाग कॉपीराईट धारकाच्या लेखी परवानगीशिवाय पुनर्मुद्रित करू नये किंवा कुठल्याही पद्धतीने पुनर्मुद्रणाच्या यंत्रणेमध्ये साठवू नये अथवा ट्रान्समीट करू नये.

महाराष्ट्रातील राजभवने
**वैभवशाली इतिहासाची साक्षीदार**



## अनुक्रमणिका

०५ मा. राष्ट्रपतींचा संदेश
०६ मनोगत
०८ प्रस्तावना

### मुंबई

२२ वास्तुविशेष
५४ कलावैभव
६६ निसर्गसंपदा

### नागपूर

७६ वास्तुविशेष
८४ कलावैभव
९० निसर्गसंपदा

### पुणे

१०४ वास्तुविशेष
११० कलावैभव
११६ निसर्गसंपदा

### महाबळेश्वर

१२६ वास्तुविशेष
१३२ निसर्गसंपदा

### राजभवनांचा पूर्वेतिहास

१३८ राजभवनांसंबंधी सर्वसाधारण लोकांना ज्ञात नसलेल्या वास्तू

### राजशिष्टाचार व महत्वाच्या घडामोडी

१४८ राजशिष्टाचार व महत्वाच्या घडामोडी
१५४ राज्यपालांची सूची

राष्ट्रपति
भारत गणतंत्र
**PRESIDENT**
**REPUBLIC OF INDIA**

## MESSAGE

I am happy to learn that the Raj Bhavan, Maharashtra is bringing out a coffee-table book on the Raj Bhavans in Maharashtra.

With the majestic Arabian Sea providing a grand backdrop, the Mumbai Raj Bhavan is undoubtedly one of the best Raj Bhavans in India.

I understand this coffee-table book will attempt to capture, through a series of photographs, the aesthetic beauty of the Raj Bhavans, their architecture, the flora and fauna, the arts, artefacts and other interesting aspects.


Raj Bhavans are more than beautiful heritage buildings located in grand surroundings. They represent an august institution of the State that has an obligation to protect the dignity of the Constitution and to uphold the rule of law. Quite naturally, people of the State have great expectations from the Raj Bhavan. It should be the endeavour of the Raj Bhavan to meet these legitimate aspirations.

I congratulate the Governor of Maharashtra on his welcome initiative in bringing out this coffee-table book, which will provide a glimpse of the Raj Bhavans of Maharashtra to all interested persons.

New Delhi

**Pranab Mukherjee**

# मनोगत



नागालँड व झारखंड येथे २००७ ते २००९ या काळात राज्यपालपद सांभाळल्यानंतर दि. २२ जानेवारी २०१० रोजी माझी महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती झाली. सन २०१२ च्या सुरुवातीलाच माझा राज्यपालपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपला. परंतु अनपेक्षितपणे ७ मे २०१२ रोजी राष्ट्रपतींनी माझी महाराष्ट्रातच पुन्हा एकदा नवीन कार्यकाळासाठी नियुक्ती केली. नागालँडमध्ये असताना मी काही काळासाठी अरुणाचल प्रदेश आणि आसामच्या राज्यपालपदाचीदेखील अतिरिक्त जबाबदारी सांभाळली होती. कालांतराने महाराष्ट्रात आल्यानंतर गोव्याच्या राज्यपालपदाचादेखील अतिरिक्त कार्यभार काही महिन्यांकरिता माझ्याकडे सोपविण्यात आला. अशाप्रकारे सहा वर्षांमध्ये तब्बल सहा वेगवेगळ्या राज्यांच्या राज्यपालपदी कार्य करण्याचा दुर्मीळ सन्मान मला प्राप्त झाला. परिणामतः मला देशातील सहा वेगवेगळ्या राज भवनांमध्ये वास्तव्य करण्याची संधी मिळाली.

भारतातील प्रत्येक राजभवन आपल्या परीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. परंतु तरीही माझी पत्नी सौ. राधा व मी मुंबई येथील राजभवनाच्या सौंदर्याने प्रथमदर्शनीच भारावून गेलो. मलबार हिल येथे एका टोकाला तीन बाजूंनी अरबी समुद्राने वेढल्यामुळे नैसर्गिक भव्यता लाभलेल्या मुंबईच्या राज भवनाला ‘देशातील सर्व राज भवनांची सम्राज्ञी’ का म्हणतात याची प्रचीती हे स्थळ पाहणाऱ्याला आल्याशिवाय राहत नाही. सौ. राधा वनस्पतीशास्त्र विषयाची प्राध्यापिका आणि त्यातही तिला बागकामाची मनापासून आवड. त्यामुळे विविध प्रकारची दुर्मीळ वनसंपदा असलेल्या राजभवनाच्या नैसर्गिक वातावरणात ती सहजपणे रमली. अर्थात राजभवन हे केवळ निसर्गरम्य परिसर व ऐतिहासिक वारशाच्या इमारती असलेले संकुल नाही; तर दोन शतकांपेक्षा अधिक काळातील राज्याच्या इतिहासाची साक्षीदार असणारी ही महत्त्वपूर्ण वास्तू आहे.

माझे निवासस्थान असलेली राज भवनतील ‘जल भूषण’ ही वास्तू सन १८८५ पासून ब्रिटिश गव्हर्नरचे व राज्यनिर्मितीनंतर महाराष्ट्राच्या राज्यपालांचे निवासस्थान राहिली आहे, तर ‘जल चिंतन’ (याचाच उल्लेख राजभवनातील लोक ‘पॉईंट बंगलो’ असा करतात) या छोटेखानी अतिथीगृहात पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांसह इतर अनेक मान्यवर मुंबई भेटीवर असताना वास्तव्य करीत असत. राजभवन हे राज्यपालांचे निवासस्थान तर आहेच, मात्र त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व पंतप्रधान यांचेदेखील ते महाराष्ट्र भेटीवर असतानाचे निवासस्थान असते. प्रचलित रूढी व संकेतांनुसार देशोदेशीचे राष्ट्रप्रमुख, शासनप्रमुख, तसेच संसदीय शिष्टमंडळे मुंबई दौऱ्यावर असताना राज्यपाल त्यांचे औपचारिक स्वागत करतात व त्यांची भेट घेतात. अशा सन्माननीय अतिथींच्या सन्मानार्थ राज्यपाल प्रीतीभोजन (Banquet) किंवा चहापानाचे (High Tea) आयोजन करतात. राजभवन हे राज्याचे व पर्यायाने राज्यातील जनतेच्या अस्मितेचे प्रतीक असल्यामुळे राजभवनांसाठी प्रशस्त वास्तू असणे व त्यांची उत्तमप्रकारे देखभाल करणे उचित ठरते.

परंपरेने राज्यपाल राज्यातील शासननियंत्रित विद्यापीठांचे कुलपती असतात. त्यामुळे उच्च शिक्षणाचा प्रसार व गुणवत्ता विकास या प्रक्रियेत त्यांचे योगदान असते. महाराष्ट्राच्या राज्यपालांवर याशिवाय आणखीही एक घटनादत्त जबाबदारी आहे. घटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) नुसार राज्यपालांवर विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाची जबाबदारी आहे. या विविधांगी भूमिकांमुळे स्वातंत्र्यपूर्व काळात कार्यकारी प्रमुख असलेले गव्हर्नर आज राज्यातील सांविधानिक प्रमुख झाले असले तरी शासनव्यवस्थेमध्ये राज भवनाचे महत्त्व आजही कायम आहे.

काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रातील राज भवनांवर आधारित एक छायाचित्ररूपी ‘कॉफी-टेबल पुस्तक’ प्रकाशित करण्याची संकल्पना मी माझे सचिव श्री. विकास चन्द्र रस्तोगी यांच्यापुढे मांडली. श्री. रस्तोगी यांनी ही संकल्पना



उत्स्फूर्तपणे उचलून धरली. अलिकडेच नागपूर येथे ‘मनरेगा’च्या आयुक्तपदी बदलून गेलेले माझे तत्कालीन उपसचिव (वैधानिक विकास मंडळ) श्री. मुथुकृष्णन् शंकरनारायणन् यांच्यावर सदर कॉफी-टेबल पुस्तक ठराविक कालमर्यादेत प्रसिद्ध करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

राज भवनाचे ऐतिहासिक महत्त्व विचारात घेऊन तसेच तज्ज्ञ सदस्य व इतिहासकार यांचे मार्गदर्शन घेऊनच हे पुस्तक तयार करण्याचे ठरविले. या दृष्टीने प्रसिद्ध इतिहासकार, पुराभिलेखतज्ज्ञ व छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे निवृत्त संचालक श्री. सदाशिव गोरक्षकर यांच्या अध्यक्षतेखाली एका तांत्रिक सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली. पुस्तकाचा आकार काय असावा, त्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव करावा या व इतर विषयांवर सूचना करून पुस्तकाची मुद्रणक्षम आवृत्ती तयार करण्याची कार्यकक्षा समितीला ठरवून देण्यात आली. गोदरेज आर्काइव्हज्च्या पुराभिलेख प्रमुख कु. वृंदा पाठारे, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या संचालिका सौ. श्रद्धा बेलसरे, सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालयाचे संचालक श्री. गो. गो. वाघमारे व माझे जनसंपर्क अधिकारी श्री. उमेश काशीकर हे या समितीचे सदस्य होते. या समितीने केलेल्या बहुमूल्य सूचनांबद्दल मी श्री. गोरक्षकर यांचे तसेच समितीच्या सर्व सदस्यांचे मनापासून आभार मानतो.

राज्यातील सर्व राज भवनांमधील ऐतिहासिक वारशाच्या वास्तूंची उत्तमप्रकारे जपणूक व देखरेख करण्याचे श्रेय राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले पाहिजे. या पुस्तकाच्या निमित्ताने मी या विभागाविषयी कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक समजतो.

माझे सचिव श्री. विकास चन्द्र रस्तोगी यांनी या कॉफी-टेबल पुस्तकाच्या मुद्रण प्रक्रियेवर सुरुवातीपासून बारकाईने लक्ष ठेवले होते. त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो व त्यांना धन्यवाद देतो. श्री मुथुकृष्णन शंकरनारायणन् यांनी सुरू केलेले कार्य, त्यांचे जागी आलेले माझे उपसचिव (वैधानिक विकास मंडळ) श्री. परिमल सिंग यांनी पूर्णत्वाला नेले, त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. राज भवनाचे परिवार-प्रबंधक श्री. वसंत साळुंके यांचेकडे सर्व राज भवनांच्या देखभालीची जबाबदारी आहे. त्यांचेही आभार मानणे आवश्यक आहे. प्रकाशनक्षेत्रात सार्थ लौकिक असलेल्या ‘मे. स्पेन्टा मल्टिमीडिया’ या संस्थेने हा सर्वांगसुंदर खंड प्रकाशित केला असून तो गुणग्राहक लोकांच्या पसंतीस निश्चितपणे उतरेल, असा मला विश्वास वाटतो. प्रसिद्ध माहितीपट छायाचित्रकार श्री. सुधारक ओलवे यांच्या सुरेख छायाचित्रणामुळे पुस्तकाचा दर्जा निश्चितपणे वृद्धिंगत झाला आहे, असे मला वाटते.

‘महाराष्ट्रातील राजभवने’ या पुस्तकाच्या मुद्रित शोधनाच्या कामात बहुमोल मदत केल्याबद्दल मी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. वसुधा कामत व विशेषतः मराठी विभागाच्या प्राध्यापिका अरूणा श्रीपाद दुभाषी यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

राज भवन ही राज्यातील जनतेची संपदा असून राज्यपाल हे केवळ विश्वस्त असतात, असे मी मानतो. त्यामुळे हे ‘कॉफी-टेबल पुस्तक’ राज्यातील जनतेला समर्पित करताना मला विशेष आनंद वाटतो.

(के. शंकरनारायणन्)
महाराष्ट्राचे राज्यपाल
राज भवन, मुंबई

# प्रस्तावना

दक्षिण मुंबईच्या टोकावर हिरव्यागार वनराईच्या कुशीत वसलेले मुंबई येथील टुमदार 'राज भवन' महाराष्ट्राच्या राज्यपालांचे निवासस्थान आहे. अरबी समुद्राने तीन बाजूंनी वेढल्यामुळे अधिकच भव्यता प्राप्त झालेल्या या राज भवनाला साहजिकच 'देशातील सर्व राज भवनांची सम्राज्ञी' म्हणून संबोधले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात 'गव्हर्नमेंट हाऊस' या नावाने ओळखले जाणारे मलबार हिल येथील राज भवन सन १८८५ पासून ब्रिटिश गव्हर्नरचे निवासस्थान व प्रमुख सत्ताकेंद्र होते. सन १८८५ पूर्वी 'गव्हर्नमेंट हाऊस' परळ येथे असतानादेखील मलबाल हिल येथील वास्तूचा वापर गव्हर्नरचे उन्हाळी निवासस्थान म्हणून होत असे. राज भवन परिसरातील काही इमारती सन १८०० व त्याही पूर्वीच्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'गव्हर्नमेंट हाऊस' चे नामकरण 'राज भवन' असे झाले व ते मुंबई प्रांताच्या राज्यपालांचे कार्यालय व निवासस्थान झाले. स्वातंत्र्यापूर्वी राजकीय घडामोडींचे मुख्य केंद्र असलेले राज भवन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्याच्या घटनाप्रमुखांचे कार्यालय व निवासस्थान झाले. त्यामुळे राज भवनाच्या वास्तूने; कार्यकारी प्रमुखाचे सत्ता केंद्र ते राज्याच्या सांविधानिक प्रमुखाचे मुख्य स्थान असे वेगळ्या प्रकारचे सत्तांतर अनुभवले आहे.

मुंबई येथील राज भवनाच्या प्रांगणातच दिनांक ३० एप्रिल १९६० रोजी मध्यरात्री १२ वाजता तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र राज्याच्या नकाशाचे औपचारिक अनावरण केले होते. महाराष्ट्राचे प्रथम राज्यपाल श्रीप्रकाश व राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासह समाजाच्या विविध क्षेत्रांतील जवळजवळ ५०० नामवंत लोक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होते.

नवीन राज्य अस्तित्वात आल्यानंतर मुंबई प्रांताचे राज भवन हे महाराष्ट्र राज्याचे राज भवन झाले. राज्यनिर्मितीनंतर गेल्या ५३ वर्षांमध्ये राज भवनाने राज्यातील अनेक सत्तांतरे पाहिली आहेत. अनेक मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळातील सहकारी, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, मुंबईचे नगरपाल, लोकायुक्त, मुख्य माहिती आयुक्त यांसह इतर घटनात्मक पदांवरील व्यक्तींचे शपथग्रहण समारोह राज भवनाने पाहिले आहेत.

मुंबईशिवाय महराष्ट्रामध्ये आणखी दोन राज भवने आहेत. एक पुणे येथे तर दुसरे नागपूर येथे. पुणे हे राज्यपालांचे पावसाळी निवासस्थान होते व राज्यपालांचा तळ जवळपास दोन महिन्यांकरिता पुणे येथे हलत असे. काही वर्षांमध्ये मात्र ही प्रथा जवळजवळ संपुष्टात आली आहे. परंतु तरीही, राज्यपाल दरवर्षी प्रथेप्रमाणे भारताच्या स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्ट रोजी, पुण्यातील विधान भवनाच्या प्रांगणामध्ये सकाळी राष्ट्रध्वजाचे आरोहण करतात आणि सायंकाळी गणेशखिंड येथील राज भवनाच्या हिरवळीवर सन्मान्य नागरिकांसाठी चहापान आयोजित करतात.

स्वातंत्र्यापूर्वी नागपूर येथील राज भवन मध्य प्रांत आणि वऱ्हाड येथील गव्हर्नरचे मुख्य सत्ताकेंद्र होते. त्यानंतर १९५६ पर्यंत ते जुन्या मध्यप्रदेशाच्या राज्यपालांचे निवासस्थान होते. १९५६ साली नागपूर मुंबई राज्यामध्ये विलीन झाले आणि त्यानंतर १९६० साली महाराष्ट्राशी संलग्न झाले. त्यामुळे ब्रिटिश आमदानीत मध्य प्रांताच्या मुख्य कमिशनरचे व पुढे गव्हर्नरचे असलेले शासकीय निवासस्थान महाराष्ट्राच्या राज्यपालांचे शासकीय निवासस्थान झाले. राज्यपालांच्या अधून-मधून होणाऱ्या नागपूर भेटीच्या वेळी आणि विशेषतः राज्य विधीमंडळाच्या नागपूर येथे होत असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या वेळी नागपूर येथील राज भवन हे राज्यपालांचे कार्यालय व निवासस्थान असते. नागपूर येथेदेखील राज्यपाल राज्य विधीमंडळाचे सदस्य तसेच शहरातील सन्मान्य व्यक्तींसाठी राज भवनाच्या हिरवळीवर चहापानाचे आयोजन करीत असतात. राज्यपाल आयोजित करीत असलेल्या औपचारिक चहापानाचा उल्लेख 'अॅट होम रिसेप्शन' असा करण्यात येतो.

महाराष्ट्रातील या तीन प्रमुख राज भवनांखेरीज राज्यपालांसाठी महाबळेश्वर येथेदेखिल उन्हाळी निवासस्थान आहे. तेथून सह्याद्रीच्या पर्वतरांगांचे मनोहारी दर्शन घडते.

या ठिकाणी एक गोष्ट नमूद करणे गरजेचे आहे. राज भवन हे केवळ राज्यपालांचेच निवासस्थान नसून भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, इतर राज्यांचे राज्यपाल तसेच घटनात्मक पदांवरील व्यक्ती महाराष्ट्र भेटीवर असताना त्यांचादेखील राज भवनांमध्येच मुक्काम असतो. विविध देशांचे राष्ट्रप्रमुख व पंतप्रधान मुंबई भेटीवर असताना शासनाच्या वतीने त्यांचे सन्मानपूर्वक स्वागत करणे हा राज्यपालांच्या कर्तव्याचा एक भाग आहे. अनेकदा या सन्माननीय अतिथींच्या सन्मानार्थ राज्यपाल प्रीतीभोजन किंवा चहापानाचे आयोजन करीत असतात. आजच्या लोकशाहीच्या काळात काहीसे राजेशाही थाटाचे वाटणारे राज भवन, त्यातील भव्य वास्तू व त्यांचा डामडौल संयुक्तिक आहे का असा टीकेचा सूर अधून-मधून उमटत असतो. मात्र राज्यपाल या संस्थेच्या उपरोक्त कर्तव्यांचा विचार करू जाता शासनाचे आणि पर्यायाने राज्यातील जनतेचे प्रतीक असलेले राज भवन आपल्या दिमाखदार स्वरूपात जतन करणे आवश्यक ठरते. राज भवन हे आज केवळ राज्याच्या राज्यपालांचे सरकारी निवासस्थान नसून ते आपल्या लोकशाहीप्रधान प्रजासत्ताकाचे प्रेरणास्थानदेखील आहे.

राज्यातील प्रत्येक राज भवनाचा स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण इतिहास आहे व त्यातून महाराष्ट्राच्या इतिहासाचेदेखील नव्या दृष्टिकोनातून दर्शन होते.

राज भवन म्हणजे एकच वास्तू असावी असा सर्वसाधारण समज असतो. मात्र मुंबई येथील राज भवन म्हणजे ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अनेक वास्तूंचा समूह असलेला एक मोठा परिसर आहे.

राज्यातील सर्व राज भवनांचा ऐतिहासिक वारसा, त्यांतील वैभवशाली वास्तूंचे सौंदर्य, राज भवन परिसराचे नैसर्गिक सौंदर्य, तेथील कलात्मक वस्तू व सामान्यांना कुतूहल वाटणाऱ्या अनेक गोष्टी चित्ररुपाने पुढे आणण्याचा प्रयत्न या कॉफी-टेबल पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. सुरेख छायाचित्रांच्या मदतीने राज भवनांचे सौंदर्य व इतिहास उलगडून दाखविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला असून पुस्तक संपूर्ण पाहून झाल्यावरदेखील यातील प्रतिमा वाचकांच्या स्मरणात राहून नजरेसमोर तरळत राहतील, यात शंका नाही.


राज भवन
RAJ BHAVAN





राज भवनामध्ये प्रवेश केल्यावर पश्चिम बाजूला अथांग समुद्र आणि किनाऱ्यालगत एक विस्तीर्ण हिरवळ दृष्टीस पडते. या हिरवळीच्या एका बाजूला एक छोटेसे हेलिपॅड असून राज्यपाल व मुख्यमंत्री शासकीय कामकाजानिमित्त मुंबईबाहेर दौऱ्यावर जाताना या तळावरूनच हेलिकॉप्टरने जाणे-येणे करतात.





जुन्या वास्तुशैलीची आठवण करून देणारे नव्यानेच तयार करण्यात आलेले राज भवनचे बाणगंगा बाजूकडील मुख्य प्रवेशद्वार (अप्पर गेट).





‘मलबार हिल’ या राज भवनच्या पत्त्यामधील ‘मलबार’ या शब्दामागील रहस्य जाणून घेण्यासाठी आपल्याला १८ व्या शतकाच्या सुरुवातीच्या इतिहासात डोकावून पहावे लागते. आज ‘मलबार हिल’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरासह मुंबईचा एक मोठा भाग उत्तर केरळच्या मलबार प्रदेशातील बडी असामी असलेल्या ‘केयी’ कुटुंबाच्या मालकीचा होता. मात्र विविध संस्थानिक व सत्ताधीशांसोबत निकटचे संबंध असूनदेखील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या हस्तक्षेपामुळे केयी कुटुंबीयांना उद्योग-व्यवसायात अनेक अडचणी येऊ लागल्या. काही काळ धैर्याने संघर्ष केल्यानंतर केयी कुटुंबाने ब्रिटिशांसोबत तडजोड केली. उत्तर मलबार प्रदेशातील आपले व्यापारी हक्क शाबूत ठेवण्यासाठी त्यांनी त्यांची मुंबईतील बहुतांश मालमत्ता ईस्ट इंडिया कंपनीला दिली. या मालमत्तेमध्ये त्यांनी ‘मलबार हिल’ नाव दिलेला दक्षिण मुंबईतील हिरवागार परिसरदेखील होता. आजचे मुंबईतील राज भवन याच ठिकाणी वसले आहे.





# मुंबई

ब्रिटिश गव्हर्नरचे निवासस्थान असलेले पूर्वाश्रमीचे 'गव्हर्नमेंट हाऊस' निसर्गरम्य अशा मलबार हिल येथे स्थलांतरित होण्यापूर्वी ते विविध काळात तीन अन्यत्र ठिकाणी होते. सर्वांत पहिले गव्हर्नमेंट हाऊस 'मनोर हाऊस' हे होते. त्यानंतर ते 'फोर्ट हाऊस' येथे गेले व त्यानंतर ते परळ येथे स्थलांतरित झाले. अशाप्रकारे मलबार हिल येथील राज भवन हे ब्रिटिश गव्हर्नरचे चौथे निवासस्थान ठरते. एका बाजूने खडकांवर उभे असलेले व ४७ एकर प्रशस्त परिसरात समुद्रकिनारी वसलेले राज भवन व त्यातील ऐतिहासिक वारशाच्या वास्तू पाहताक्षणीच मन हरखून जाते.

आपल्या दोनशे वर्षांपेक्षा अधिक काळाच्या इतिहासात राज भवनाने अनेक भरत्या–ओहोट्या पाहिल्या आहेत व त्यातून ते आणखीनच उजळून निघाले आहे. या वास्तूमधून राज्यावर शासन केलेल्या अनेक व्यक्तींनी आपल्या कर्तबगारीच्या पाऊलखुणा राज भवनाच्या परिसरात सोडल्याचे पदोपदी जाणवते. कालौघात राज भवन बदलले आहे. मात्र त्यासोबतच त्याने आपला ऐतिहासिक वारसादेखील जतन केलेला आहे. त्यामुळे राज भवन येथे आधुनिकता व ऐतिहासिक वारसा यांचा सहजसुंदर संगम पहायला मिळतो.

# वास्तुविशेष

मुंबई येथील राज भवन साधारणात: अर्धवर्तुळाकार परिसरात उभ्या असलेल्या सात महत्त्वाच्या इमारतींचा समूह आहे. जल विहार, जल भूषण, जल लक्षण, जल चिंतन, जल सभागृह, जल किरण व जल पूजन ह्या परिसरातील महत्त्वाच्या इमारती आहेत. यांतील प्रत्येक वास्तूचे आपले स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. राज भवनाच्या पूर्व बाजूला असलेला चार किलोमीटर लांबीचा मरीन ड्राईव्ह रात्रीच्या वेळी त्यावरील सर्व दिवे लागल्यावर येथून जणू 'राणीचा हार' असल्यासारखा दिसतो.

सन १८२० साली मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी मलबार हिल येथे 'मरीन व्हिला' नावाचा टुमदार बंगला बांधला होता. आज उभे असलेले राज भवन याच बंगल्याच्या ठिकाणी व अवतीभवती वसलेले आहे. एक शतकाहून अधिक काळ लोटल्यामुळे राज भवनातील प्रत्येक इमारतीमध्ये कालानुरूप अनेक बदल करण्यात आले. त्यामुळे येथील इमारतींमध्ये ब्रिटिशकालीन स्थापत्यकला व आधुनिकता यांचा मिलाफ बघायला मिळतो. या प्रकरणात मुंबईमधील राज भवनातील स्थापत्यसौंदर्याची झलक छायाचित्ररूपाने दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.



जल सभागृहाच्या अर्धवर्तुळाकार व्हरांड्यातून उजवीकडे नजर टाकल्यास राज्यपालांचे कार्यालय व निवासस्थान असलेली 'जल भूषण' ही वास्तू दिसते.



राज्यपालांचे निवासस्थान असलेल्या 'जल भूषण' बंगल्यामागील हिरवळ. याच हिरवळीवर राज्यपालांचे प्रजासत्ताक दिनाच्या (२६ जानेवारी) संध्येला निवडक निमंत्रितांसाठी चहापान होत असते.

## जल भूषण

राज भवन परिसरातील सर्वाधिक महत्त्वाच्या इमारतींपैकी एक असलेली 'जल भूषण' ही वास्तू सन १८८५ पासून ब्रिटिश गव्हर्नरचे व कालांतराने महाराष्ट्राच्या राज्यपालांचे निवासस्थान म्हणून ओळखली जाते. कालानुरूप ब्रिटिश गव्हर्नर व स्वातंत्र्योत्तर काळातील राज्यपालांच्या सूचनांनुसार या इमारतीमध्ये अनेक बदल करण्यात आले आहेत. जल भूषण इमारतीच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या राज्यपालांच्या निवासस्थानातून पश्चिमेकडील अरबी समुद्र व त्याला भिडणाऱ्या क्षितिजाचे अप्रतिम निसर्गसौंदर्य पहायला मिळते. जल भूषणच्या तळमजल्यावर राज्यपालांचे कार्यालय आहे. त्याशिवाय राज्यपालांच्या अतिथींसाठी प्रतीक्षा कक्ष, शिष्टमंडळांच्या भेटीसाठी कॉन्फरन्स रूम, दर्शनी भागातील मोकळी जागा, महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटीसाठी राखीव असलेला लाऊंज (यालाच पूर्वी 'कोल्ड रूम' हे नाव होते), राज्यपालांचा भोजनकक्ष, पाकगृह (पॅन्ट्री) तसेच राज्यपालांचे ए. डी. सी. (परिसहायक), खाजगी सचिव आणि जनसंपर्क अधिकारी यांची कार्यालये आहेत.





डावीकडे: 'जल भूषण'च्या तळमजल्यावरील परिषद कक्ष (Conference Room). अलिकडेच या कक्षाचे नूतनीकरण करण्यात आले असून तो अद्ययावत सुविधांनी सुसज्ज केला आहे.

उजवीकडे: 'जल भूषण'च्या तळमजल्यावरील राज्यपालांचे कार्यालय. येथील अंतर्गत सजावटीमध्ये राजपूत व मुघल शैलींचा प्रभाव दिसून येतो.



डावीकडे:
'जल भूषण'च्या तळमजल्यावरील 'द लाऊंज' हा मुख्य बैठक कक्ष. याच ठिकाणी राज्यपाल महत्त्वाच्या अतिथींना भेटतात. या कक्षाचेदेखील अलिकडेच नूतनीकरण व फर्निशिंग करण्यात आले आहे.

उजवीकडे:
'जल भूषण'च्या तळमजल्यावरील राज्यपालांचा भोजन कक्ष (Dining Room).
सन १८९६ साली प्रसिद्ध अमेरिकन लेखक मार्क ट्वेन आपल्या भारत भेटीमध्ये तत्कालीन ब्रिटिश गव्हर्नर सँडहर्स्ट यांना राज भवन येथे भेटल्याची व त्यांनी त्यांचेसोबत भोजन केल्याची नोंद इतिहासात आढळते. ही भेट या कक्षातच झाली असण्याची शक्यता आहे.



## जल लक्षण


सन १८१३ साली ब्रिटिश गव्हर्नर सर ईव्हान नेपिअन यांनी हा बंगला बांधला होता. त्या वेळी त्याला ‘गव्हर्नरचा कौलारू बंगला’ म्हणायचे. विसाव्या शतकाच्या शेवटी हाच बंगला ‘फ्लॅग स्टाफ बंगला’ या नावाने ओळखला जाऊ लागला. आज ‘जल लक्षण’ हे नाव धारण केलेल्या या बंगल्याला ‘प्रेसिडेन्शियल सूट’ असेही म्हणतात. भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व इतर राज्यांचे राज्यपाल मुंबई भेटीवर असताना याच बंगल्यात त्यांचा मुक्काम असतो.

एखाद्या राष्ट्रप्रमुखाच्या निवासस्थानाला शोभून दिसतील अशा आवश्यक सुविधा या बंगल्यामध्ये उपलब्ध आहेत. आज दोनशे वर्षे पूर्ण झालेल्या या बंगल्याने वास्तु रचनेतील अनेक बदल पाहिले आहेत. विविध देशांचे राष्ट्रप्रमुख व पंतप्रधान मुंबई भेटीवर असताना राज्यपाल जल लक्षण येथील मुख्य स्वागत कक्षामध्ये या नेत्यांचे औपचारिक स्वागत करतात व भेटीनंतर त्यांना ‘बॅन्क्वे हॉल’ (जल विहार) येथे शाही भोजनासाठी घेऊन जातात.

मराठा कालखंडातील वैशिष्ट्यपूर्ण असे कोरीव लाकडी स्तंभ, मुख्य हॉलमधील सोनेरी रंगात रंगविलेले लाकडी सोफासेट्स्, पश्चिमेकडील कक्षांमधील नक्षीदार लाकडी फर्निचर या सर्व वस्तू या इमारतीने पाहिलेल्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देतात. महाराष्ट्रातील जत, कुरुंदवाड, फलटण व इतर ठिकाणच्या मराठा सरदारांची थ्योडोर जेन्सन या चित्रकाराने १८६६ साली काढलेली जिवंत व्यक्तिचित्रे ‘जल लक्षण’च्या मुख्य सभागृहाच्या भिंतींवर आजही पहायला मिळतात.



राज भवनातील ‘जल लक्षण’ हा अध्यक्षीय प्रासाद. भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व पंतप्रधान मुंबई भेटीवर असताना त्यांचे वास्तव्य याच बंगल्यात असते.



जल लक्षण प्रासादातील मुख्य ‘शयन कक्ष’. येथील सजावट साधी तरीही सौंदर्यपूर्ण असल्यामुळे वास्तव्यास आलेल्या सन्माननीय अतिथींना येथील वातावरण आपुलकीचे व सुखद वाटते.






जल लक्षण मधील छोटा ‘भोजनकक्ष’.



‘जल लक्षण’च्या दर्शनी भागातील मध्यवर्ती बैठक कक्ष. याच कक्षामध्ये राज्यपाल विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांचे स्वागत करतात. तसेच भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व पंतप्रधान या प्रासादात मुक्कामाला असताना आपल्या अतिथींना ते याच कक्षात भेटत असतात.




'जल चिंतन' बंगला. मलबार हिलच्या अगदी टोकावर समुद्रकिनारी खडकाच्या कडेवर उभा असलेला हा बंगला 'पॉईंट बंगलो' या नावाने ओळखला जातो. पूर्वी यालाच 'हन्टिंग लॉज' किंवा 'सिग्नलर्स हाऊस' हे नाव होते.



## जल चिंतन

अगदी सुरुवातीच्या काळात 'सिग्नलर्स हाऊस' या नावाने परिचित असलेल्या व आज 'जल चिंतन' हे नाव धारण केलेल्या या बंगल्याला राज भवनातील लोक 'पॉईंट बंगलो' या नावाने ओळखतात. याचे कारण हा बंगला मलबार हिलच्या अगदी टोकावर वसलेला आहे. इतिहासातील नोंदीनुसार सन १७१० साली श्रीगुंडी देवी मंदिराजवळ उभा असलेला लहानसा एकमात्र बंगला तोच हा असावा अशी दाट शक्यता आहे. त्या वेळी तो बंगला शिपायांकरिता सुरक्षागृह म्हणून वापरण्यात येत असे. विशाल समुद्र आणि किनारा यावर जागता पहारा ठेवण्यासाठी युद्धनीतीच्या दृष्टिकोनातून तो बांधला असल्याचे स्पष्टपणे जाणवते. मलबार पॉईंट येथे ईव्हान नेपिअन यांनी पक्का कौलारू बंगला (सध्याचे 'जल लक्षण') बांधेपर्यंत 'जल चिंतन' हा एकमात्र बंगला अस्तित्वात होता. कदाचित या बंगल्यातून दिसणारा सूर्यास्त व कायम वाहणारा गार समुद्रीवारा यामुळेच पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी हे नेते मुंबईत वास्तव्यास असताना या बंगल्यात राहणे पसंत करीत.



डावीकडे: 'जल चिंतन' अतिथीगृहातील मुख्य बैठक कक्ष. भव्य अरबी समुद्रावर दृष्टिक्षेप टाकणाऱ्या या कक्षातील काचेच्या खिडक्यांमधून मुंबईच्या मरीन ड्राईव्हचे नयनरम्य दृश्य दिसते.

उजवीकडे: लहानशीच परंतु सौंदर्यपूर्ण पद्धतीने सजावट केलेली जल चिंतन मधील 'डायनिंग रूम'. डायनिंग टेबलच्या मागील बाजूस कोरीव काम केलेले आभासी द्वार आहे. त्यामागील दिवे लागल्यानंतर प्रकाशाच्या सौम्य तेजाने द्वारातील सुंदर नक्षीकाम उठून दिसते.



## जल सभागृह

सर्वसाधारणपणे औपचारिक स्वरूपाच्या कार्यक्रमांसाठी जलसभागृहाची निर्मिती करण्यात आली. याच जल सभागृहाला ‘दरबार हॉल’ म्हणतात. शपथविधी तसेच इतर शासकीय व सांस्कृतिक कार्यक्रम या सभागृहामध्ये होत असतात. या सभागृहाची आसनक्षमता साधारणपणे २५० पाहुणे बसू शकतील इतकी आहे.

सन १९११ साली जॉर्ज विटेट यांनी दरबार हॉलची वास्तूरचना केली. आज शतकपूर्ती झालेला व इतिहासाचा साक्षीदार असलेला हा हॉल तितक्याच दिमाखाने उभा आहे.





जल सभागृह: सामान्यतः दरबार हॉल या नावाने परिचित असलेली ही वास्तू सन १९११ साली बांधण्यात आली. राज्यपाल, मुख्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व इतर काही घटनात्मक पदांवर नियुक्त झालेल्या व्यक्तींचे शपथग्रहण समारंभ याच सभागृहामध्ये होतात.



सुरूवातीला 'जल नायक' हे नाव असलेल्या दरबार हॉलची आसनक्षमता अंदाजे २५० लोक बसू शकतील इतकी आहे. दरबार हॉलच्या दोन्ही बाजूंना जीवनवृक्ष ही संकल्पना दर्शविणारी विशाल तैलचित्रे आहेत. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाने खास राज भवनसाठी ही तैलचित्रे तयार करवून घेतली होती.

## जल विहार

इंग्रजांचे शिष्टाचार व त्यांच्या करमणुकीचे रीतीरिवाज दृष्टिक्षेपात ठेवून रचना करण्यात आलेल्या 'जल विहार' मध्ये डाव्या बाजूला 'बॉलरूम' व त्याच्या विरुद्ध बाजूला विशाल 'बॅन्क्वे हॉल' (भोजन कक्ष) आहे. याठिकाणी एकाच वेळी किमान ४० जण शाही भोजनाला बसू शकतील इतके प्रशस्त टेबल आहे. जल विहारच्या मागील व पुढील बाजूला एक प्रशस्त व्हरांडादेखील आहे. साधारणपणे विविध देशांचे राष्ट्रप्रमुख व पंतप्रधान मुंबई भेटीवर असताना त्यांच्या सन्मानार्थ आयोजित शाही-भोजन समारंभ येथे होतात. जल विहारच्या वास्तूरचनेमध्ये विविध वास्तू संस्कृतींचा मिलाफ पहायला मिळतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जलविहारमध्ये कालानुरूप बदल करण्यात आले आहेत. देश-विदेशातील पाहुण्यांना आपल्या अभिजात सौंदर्याने थक्क करणाऱ्या जलविहार या वास्तूमध्ये मूळ ब्रिटिश वास्तूरचनेची वैशिष्ट्ये मात्र जशीच्या तशी ठेवण्यात आली आहेत. दारांच्या कमानी, खिडक्या व फर्निचरमध्ये मात्र भारतीय कलाकुसरीचा प्रभाव पहायला मिळतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात बॉलरूम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हॉलमध्ये सध्या विदेशी राष्ट्रप्रमुखांच्या सन्मानार्थ होणाऱ्या शाही भोजनापूर्वी उभय देशांच्या शिष्टमंडळातील सदस्यांचा परस्परांशी परिचय व अनौपचारिक चर्चा होते. त्यानंतर राज्यपाल सर्व सन्माननीय अतिथींसह बॅन्क्वे हॉलकडे भोजनासाठी प्रस्थान करतात.



मुंबई राज भवनातील अत्यंत पुरातन वास्तूंपैकी एक असलेले 'जल विहार'. जल विहारच्या एका बाजूला बॉलरूम असून दुसऱ्या बाजूला एक भव्य भोजन कक्ष आहे. या वास्तूने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून अनेक अतिथींच्या सन्मानार्थ दिल्या जाणाऱ्या शाही मेजवान्या पाहिल्या आहेत.



‘जल विहार’ सभागृहाचे मुख्य प्रवेशद्वार. येथून आत प्रवेश केल्यावर डावीकडे बॉलरूम व उजवीकडे बॅन्क्वे हॉल (भोजन कक्ष) दृष्टीस पडतो. १९ व्या शतकातील जाळीदार नक्षीकाम आणि प्रवेशद्वार असलेल्या दोन लाकडी भिंती या दोन्ही कक्षांना विलग करणाऱ्या पडद्याचे काम करतात. या लाकडी नक्षीदार भिंतींना ‘मद्रास वुडन जाली’ म्हणतात. जल विहारच्या मध्यवर्ती भागात तीन लाकडी फलक असून त्यांवर सन १६६५ पासून मुंबई प्रांताचे गव्हर्नर होऊन गेलेल्या तसेच १९६० पासून महाराष्ट्राचे राज्यपालपद भूषविणाऱ्या व्यक्तींच्या नावांची त्यांच्या कार्यकालांसह सूची लावलेली आहे.



जल विहारमधील जुन्या वास्तूशैलीची आठवण देणारी 'बॉलरूम'. याचठिकाणी समारंभीय भोजनापूर्वी राज्यपालांच्या निमंत्रितांचा इतर देशाच्या राष्ट्रप्रमुखांच्या शिष्टमंडळातील सदस्यांशी परिचय होतो व उभयपक्षी अनौपचारिक चर्चा होते.



राज भवनातील सर्वाधिक जुन्या वास्तूंपैकी एक असलेल्या जल विहारमधील याच 'बॅन्क्वे हॉल' मध्ये राज्यपाल देशोदेशीच्या राष्ट्रप्रमुख व शासनप्रमुखांच्या सन्मानार्थ शाही मेजवानीचे आयोजन करीत असतात.



# कलावैभव

आजही राज भवनात कलाकुसर व नक्षीकाम असलेले लाकडी फर्निचर, चित्रे, शिल्पे या व इतर दुर्मीळ वस्तू जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. या सर्व वस्तू येथे विविध काळात वास्तव्यास असलेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील गव्हर्नर्स व राज्यपालांच्या उच्च अभिरुचीची साक्ष देतात. गव्हर्नर एल्फिन्स्टन यांनी आणलेले फ्रेंच फर्निचर, ईराणी राजकुमारीचे १९ व्या शतकातील चित्र, अकराव्या शतकातील शिवपार्वतीचे शिल्प या आणि इतर वस्तू जुन्या राज्यकर्त्यांची सौंदर्यदृष्टी व कलेप्रती अभिरुची दाखवितात.

राज भवनाला भेट देणाऱ्या अनेक अतिथींनी राज्यपालांना दिलेल्या कलात्मक वस्तूदेखील राज भवनात जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. यांपैकी निवडक वस्तू व शिल्पे यांची छायाचित्रे या प्रकरणामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.



'बॉलरूम व 'बँक्वे हॉल' या कक्षांना विलग करणाऱ्या कोरीव लाकडी भिंतींवरील कलाकुसरीमध्ये दडलेले एडक्याचे शीर गतकाळातील कारागीरांचे हस्तकौशल्य व कलेप्रती बांधीलकी दर्शविते.



डावीकडे:
जल विहारच्या मध्यवर्ती भागात लावलेले एक आकर्षक झुंबर

उजवीकडे: जल भूषणच्या दर्शनी भागात ठेवलेली नटराजाची अष्टधातूची मूर्ती





डावीकडे:
मे २०१२ मध्ये मृत झालेला राज भवनातील हा मोर टॅक्सीडर्मी शास्त्रानुसार जतन करून जल विहारच्या दर्शनी भागात ठेवण्यात आला आहे.

उजवीकडे:
जल भूषणच्या तळमजल्यावरील राज्यपालांचा भोजन कक्ष व पाकगृह यांच्यामध्ये आडपडदा म्हणून फायबर चौकटीमध्ये ठेवण्यात आलेली थर्माकोलची कलाकृती.













अगदी डावीकडे: राज्यपालांच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ ठेवलेली चिनी मातीची फुलदाणी


डावीकडे: जल लक्षणच्या बैठक खोलीमध्ये टेबलावर ठेवलेला पितळ धातूचा मोर.

उजवीकडे: ब्रिटिश गव्हर्नरच्या राजवटीत आणलेले फ्रेंच फर्निचर आज राज्यपालांच्या कार्यालयात ठेवलेले आहे. शतकाहून अधिक काळ जुन्या या फर्निचरवरील चित्रे आजही आश्चर्यकारकरित्या आपल्या मूळ रंगांसह शाबूत आहेत.



जल भूषण
वास्तूमधील
तळमजल्यावरील
भोजन कक्षाच्या
उजवीकडून
राज्यपालांच्या
निवासस्थानाकडे
जाणारा हा जुन्या
पद्धतीचा जिना





जल भूषणच्या
व्हरांड्यात एका
बाजूला कोरीव
काम केलेला
जुना कलात्मक
आभासी दरवाजा.



# निसर्गसंपदा

एकेकाळी मलबार हिल हा घनदाट झाडी असलेला प्रदेश होता व तेथे बोटांवर मोजण्याइतके बंगले, विशेषत: शासकीय निवासस्थाने होती. वाढत्या शहरीकरणामुळे मलबार हिल येथील हरित प्रदेश कमी झाला असला तरीही राज भवनातील जवळजवळ दोन कि. मी. लांबीचे जंगल मात्र आजतागायत जतन करून ठेवण्यात आले आहे. विविध प्रकारची झाडे, वनस्पती व वेली तसेच पशुपक्षी यांचा तेथे मुक्त संचार आहे. अनेकदा वाळकेश्वर मार्गाला मिळणाऱ्या रस्त्याने ये-जा करीत असताना पुढे मोरांचे थवे नाचत असल्यामुळे राज्यपालांच्या मोटारगाड्यांचा ताफा काही काळ थांबवावा लागतो.

बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी (बी.एन्.एच्.एस्.) या संस्थेने १९९७ साली केलेल्या पाहणीनुसार राज भवन परिसरात ३६ विविध पक्ष्यांच्या प्रजाती आढळल्याचे नमूद केले आहे. त्याशिवाय येथे दुर्मीळ सागरी प्रवाळ, उभयचर प्राणी, फुलपाखरे व कीटक आढळल्याचे नमूद केले आहे. झाडांच्या काही दुर्मीळ प्रजातीदेखील येथे टिकून आहेत. या प्रकरणामध्ये राज भवनातील निसर्गसंपदेचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.




राजभवन परिसर निसर्गसौंदर्याने नटला असून आज मुंबईत अस्तित्वात असलेल्या मोजक्या जैव-विविधता परिसरांमध्ये त्याची गणना होते.



आपल्या सावजाच्या शोधात फिरताना अचानक सावध पवित्रा घेतलेला हा राज भवनातील मुंगूस





राज भवन परिसरात खारुताईंच्या हक्काची काही झाडे आहेत. दरबार हॉलसमोरील अशाच एका झाडावरून उदरभरणासाठी खाली उतरलेली ही खार इथल्या पशूपक्ष्यांच्या सह-अस्तित्वाची साक्ष देते.



डावीकडे:
राज भवनात नव्यानेच तयार करण्यात आलेल्या हरितगृहामध्ये विविध प्रजातींची रंगीबेरंगी फुलझाडे, आतील थंड व हवेशीर वातावरणात बहरत आहेत.

उजवीकडे:
'जल भूषण' या राज्यपालांच्या निवासस्थानाच्या मागील बाजूस वेगवेगळ्या पातळ्यांवर दोन हिरवीगार लॉन्स आहेत. 'अप्पर लॉन'च्या मध्यभागी नीलकमळाचे एक छोटे वर्तुळाकार तळे आहे.









# नागपूर

नागपूर येथील राज भवन सुरुवातीला मध्य प्रांताच्या मुख्य कमिशनरचे निवासस्थान होते. कालांतराने ते मध्य प्रांत आणि वऱ्हाडच्या गव्हर्नरचे निवासस्थान झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तेच जुन्या मध्यप्रदेशाच्या राज्यपालांचे निवासस्थान झाले व शेवटी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रातील राज भवनांपैकी एक झाले. सेमिनरी हिलच्या हिरव्यागार कुशीत, प्रसिद्ध सीताबर्डी किल्ल्याच्या पश्चिम दिशेला उभ्या असलेल्या नागपूर येथील राजभवनाला स्थानिक लोक 'गव्हर्नर कोठी' म्हणूनही ओळखतात. एकशेवीस वर्षांपेक्षाही अधिक काळाचा ऐतिहासिक वारसा लाभलेली राज भवनाची भव्य वास्तू स्वातंत्र्यपूर्व तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक महत्त्वपूर्ण घटनांची साक्षीदार राहिली आहे.

नागपूर येथील राज भवनाची इमारत बांधण्यास अंदाजे २ ते ३ वर्षांचा कालावधी लागला. मध्य प्रांताचे मुख्य कमिशनर ए. पी. मॅकडोनाल्ड हे नागपूर राजभवन या देखण्या इमारतीतील सर्वप्रथम निवासी होते. कमिशनरचे निवास्थान असलेली ही इमारत कालांतराने मध्य प्रांताच्या गव्हर्नरचे 'गव्हर्नमेंट हाऊस' झाली. या प्रकरणामध्ये गतकाळचे स्मरण आणि भविष्याची उमेद जागविणाऱ्या या ऐतिहासिक वास्तूचे विविध अंगांनी दर्शन घडविण्यात आले आहे.

# वास्तुविशेष

सर्व बाजूंनी वृक्षवल्लींनी वेढलेली नागपूर येथील राज भवनाची जुन्या काळातील भव्यदिव्य आणि देखणी वास्तू पाहून आपण विस्मित होतो. या वास्तूने ब्रिटिश व भारतीय अशा वेगवेगळ्या संस्कृती जवळून पाहिल्या असल्यामुळे स्वाभाविकपणे तिच्या रचनेमध्येदेखील वेगवेगळ्या वास्तुशैलींचा संगम पाहावयास मिळतो.

नक्षीदार कमानी, व्हरांडा व त्यातून दिसणारी 'बॉल रूम', मुख्य दिवाणखाना व भोजनकक्ष आपल्या भव्यतेमुळे पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतात. संपूर्ण दरबार हॉलमध्ये टाकण्यात आलेला पर्शियन गालिचा या वास्तूने पाहिलेल्या वैभवशाली काळाची आठवण देतो. नागपूर राज भवन येथे आलेला प्रत्येक अतिथी येथील स्वच्छ, सुंदर व हिरवेगार वर्तुळाकार लॉन बघून थक्क न झाला तरच नवल! या लॉनमुळे राज भवन वास्तूची भव्यता आणि सौंदर्य निश्चितच खुलून दिसते.



नागपूर राज भवनाच्या ऐतिहासिक इमारतीच्या कमानीदार व्हरांड्यातून पाण्याचे उंच कारंजे व समोरील विस्तीर्ण हिरवेगार लॉन दृष्टीस पडते.





डावीकडे:
राज भवनाच्या मुख्य इमारतीमध्ये डाव्या बाजूला असलेला दरबार हॉल शासकीय व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वापरण्यात येतो.

उजवीकडे: दरबार हॉलमधील छोटेखानी व्यासपीठ



नागपूर येथील राज भवनच्या व्हरांड्यालगत अलिकडेच रंगीबेरंगी प्रकाश व संगीत योजना असलेले 'म्युझिकल कारंजे' निर्माण करण्यात आले आहे.